ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारी प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ९ फेब्रुवारी, १९५५ | अंक ६

## विविध माहिती

**भारतासाठी मालाचे डबे**—भारतीय रेल्वेजसाठी ५,३०० मालाचे डबे बांधण्याचें काम दोन अमेरिकन कंपन्या आणि एक ब्रिटिश कंपनी ह्यांच्याकडे सोंपविण्यांत आलें आहे. भारतीय रेल्वेच्या पुनर्रचनेसाठी अमेरिकेकडून १००.रेल्वे-एंजिनें आणि ८,७०० मालाचे डबे मिळणार आहेत. अमेरिकेकडून एकूण ३,९०,००,००० डॉलर्स किंमतीचें रेल्वेचें सामान मिळणार आहे.

**टागोरांच्या ग्रंथांचें रशिअन भाषांतर**—रविंद्रनाथ टागोर ह्यांच्या ग्रंथांचें रशिअन भाषांतर रशिआंत प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. त्यांचे सर्व ग्रंथ एकूण आठ खंडांत प्रसिद्ध करण्यांत येतील. ही आवृत्ति १९५७ सालीं प्रसिद्ध होईल. टागोरांनीं लिहिलेल्या गोष्टींचें पुस्तक मात्र लवकरच प्रकाशित करण्यांत येणार आहे. ह्या पुस्तकाच्या २,४०,००० हजार प्रती काढण्यांत येतील.

**खादी विणणाऱ्यांसाठी घरें**—सौराष्ट्र खादी व ग्रामोद्योग बोर्डानें खादी विणणाऱ्या विणकरांसाठी घरें बांधून देण्याचें ठरविलें आहे. राज्यांतील निरनिराळ्या खादी-केंद्रांच्या ठिकाणीं घरें बांधण्यांत येतील. ह्या कामासाठी १५,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. प्रत्येक विणकर कुटुंबाला घर बांधण्यासाठी ५०० रुपये प्रमाणें, ३० कुटुंबांत वरील रक्कम वाटण्यांत येणार आहे.

**अहमदाबादचें रेल्वे स्टेशन**—अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशननें अहमदाबादचें रेल्वे-स्टेशन नवीन बांधण्याची मागणी रेल्वेकडे केली आहे. हें स्टेशन ७० वर्षांचें जुनें असून अहमदाबादसारख्या मोठ्या लोकवस्तीच्या औद्योगिक शहरास शोभण्यासारखें नाहीं, असें कॉर्पोरेशनचें म्हणणें आहे.

**अणुशक्तीच्या एंजिनिअर्सना शिक्षण**—अणुशक्तीविषयक एंजिनिअर्सना शिक्षण देणारा युरोपमधील पहिला अभ्यासक्रम मँचेस्टर विद्यापीठातर्फे सुरू करण्यांत आला आहे. शिक्षणक्रम ६ आठवड्यांचा ठेवण्यांत आला असून बहुतेक विद्यार्थी उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांतून निवडण्यांत आले आहेत. अणुशक्तीच्या औद्योगिक उपयोगाविषयीं उद्योगधंद्यांतील लोकांकडून अधिकाधिक जिज्ञासा दाखविण्यांत आल्यामुळें हा उपक्रम करण्यांत आला आहे.

**पाकिस्तानचा रेडिओ**—पाकिस्तानच्या रेडिओ-सर्व्हिसची व्यापारी पद्धतीवर पुनर्घटना कशी करतां येईल ह्यासंबंधीं विचार करण्याकरतां पाकिस्तान सरकार एक कमिशन नेमण्याचा विचार करीत आहे, असें समजतें. रेडिओच्या कामासंबंधीं तपासणी करून सुधारणा सुचविण्याचें कामहि कमिशन करील.

**बनारस येथील घाटांचा जीर्णोद्धार**—बनारस शहरांतील गंगेच्या कांठावरील विस्तीर्ण घाटांच्या जीर्णोद्धाराचें काम सुरू करण्यांत आलें आहे. सर्व घाट दुरुस्त होण्यास एक कोटी रुपये खर्च करावे लागतील, असा अंदाज आहे. परंतु, पैशाच्या टंचाईमुळें तूर्त ४५ लाख रुपयेच राज्य सरकार खर्च करणार आहे.

**राजस्थानचा औद्योगिक विकास**—राजस्थान सरकारचे मुख्य मंत्री, श्री. मोहनलाल सुखाडिआ हे मुंबई, हैदराबाद व मद्रास ह्या शहरांचा दौरा करून जयपूरला परत गेले. त्यांनीं आपल्या दौऱ्यांत प्रमुख उद्योगपतींच्या व बँकर्सच्या भेटी घेतल्या. कांहीं उद्योगपतींनीं राजस्थानांत भांडवल गुंतविण्याचें कबूल केल्याचें समजतें. राजस्थानमध्यें अल्प-बचतीच्या योजनेप्रमाणें जमलेली १ कोटी रुपयांची रक्कमहि उद्योगीकरणासाठी वापरली जाईल.

**तंत्रज्ञ शिकवून तयार करणार**—कच्छच्या सरकारनें तंत्रज्ञ शिकवून तयार करण्याची एक योजना तयार केली आहे. डिझेल एंजिन चालविणारे, वायरमेन, स्विच बोर्ड ऑपरेटर्स इत्यादी कामें करणारे लोक शिकवून तयार करण्यांत येणार आहेत. शिकाऊ लोकांना सहा महिन्यांपासून वर्षापर्यंत मासिक ३० ते ६० रुपयांपर्यंत भत्ता देण्यांत येणार आहे.

**जपानमध्यें तांत्रिक शिक्षण घेणार**—चंदीगड येथील कारखान्यांतून सायकलींचे भाग व शिवण्याचीं यंत्रें तयार करणाऱ्या ६ भारतीय तंत्रज्ञांना ह्या धंद्याचें अधिक शिक्षण देण्यासाठी जपानमधील अशाच कारखान्यांत पाठविण्यांत येणार आहे.

**ब्रिटनला कापूस विकण्याची खटपट**—रशिअन व्यापारी संस्थांचे दोन प्रतिनिधी कांहीं दिवसांपूर्वी ब्रिटनमध्यें गेले होते. त्यांनीं लँकेशायर येथील कापडाच्या गिरण्यांना अधिक कापूस विकण्याची खटपट केली. ब्रिटनला ३,००,००० गासड्या कापूस विकून २ कोटी पौंड मिळविण्याचा रशिआचा इरादा आहे. ह्या रकमेंतून ब्रिटनकडून विजेची व एंजिनिअरिंगच्या धंद्याची यंत्रसामुग्री आयात करण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानांत निर्नियंत्रण**—आयात करण्यांत येणाऱ्या कांहीं मालावरील नियंत्रणें फेब्रुआरी महिन्याच्या अखेरपासून रद्द करण्याचा पाकिस्तान सरकारचा विचार आहे, असें समजतें. कापड, रंग, रसायनें, टायर्स, ट्यूब्स, लहान मुलांना लागणारे अन्नपदार्थ, इत्यादि मालाचा पुरवठा भरपूर असल्यामुळें नियंत्रणें रद्द करण्यांत येणार आहेत.

# राष्ट्राबरोबर स्वतःची भरभराट साधा

आपले बचत केलेले पैसे

भारत सरकारच्या **लहान बचतींच्या योजनेंत गुंतवा**

## आणि भारताच्या पुढील योजनांना साह्य करा

* समाज विकास योजना
* प्रचंड धरण योजना
* समाज कल्याण योजना
* लोहमार्ग व रस्ते वाढ

आपले पैसे यांपैकीं कोणत्याही आकर्षक व हमी असलेल्या सिक्युरिटींमध्यें गुंतवा

| | |
|---|---|
| १२-वर्षांची नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस् | पूर्ण मुदत भरल्यावर दरसाल दर शेकडा ४·१६ दरानें व्याज. रु. ५/- ते रु. ५,०००/-च्या किंमतींत मिळतात. व्यक्तिगत रक्कम रु. २५,००० पर्यंत. |
| १०-वर्षांची ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकेटस | दरसाल ३½ टक्के व्याज दिलें जातें. रु. १००/-च्या पटींत रु. २५,०००/- पर्यंत मिळतात. व्यक्तिगत रक्कम रु. २५,०००/- पर्यंत. |
| १०-वर्षांची नॅशनल प्लॅन सर्टिफिकेटस् | पूर्ण मुदत भरल्यावर दरसाल दर शेकडा ४½ प्रमाणे व्याज. रु. २५/-, रु. ५०/-, रु. १००/-, आणि रु. ५००/-, च्या किंमतींत मिळतात. व्यक्तिगत रक्कम रु.१०००/-, पर्यंत. |
| पोष्ट ऑफिस सेव्हिंग्ज बॅंक. अकाउन्टस | रु. १०,०००/-, पर्यंतच्या डिपॉझिटांवर २ टक्के आणि नंतरच्या शिलकेवर रु. १५,०००/- पर्यंत १½ टक्का व्याज जमा केलें जातें. |

### १५-वर्षांची ॲन्युइटी सर्टिफिकेटस्

दर्शनी किंमती : रु. ३५००/-, रु. ७,०००/-, रु. १४,०००/-, रु. २८,०००/-, व्यक्तिगत रक्कम रु. २८,०००/- पर्यंत.

पंधरा वर्षांपर्यंत दर महा मिळावयाच्या रकमेच्या रूपानें ३½ टक्के दरसाल चक्रवाढ व्याज जोडून परत फेड केली जाते.

उत्पन्नावरील कर-माफ उत्कृष्ट मिळकतीची *तुम्हांला हमी मिळते*

या गुंतवणुकीसंबंधीच्या अधिक माहितीसाठीं आणि / किंवा नियमांसाठीं कृपा करून नॅशनल सेव्हिंग्ज कमिशनर, सिमला, किंवा तुमच्या राज्याचे री रीजनल नॅशनल सेव्हिंग्ज ऑफिसर यांना लिहा.

AC 650 MR

## भारताच्या भविष्यकालीन विकासासाठीं रक्कम गुंतवा



★ एका वर्षांत दुसरी आवृत्ति
★ गुजराती भाषांतर

## कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : श्री. वा. काळे

पृ. सं. १६८ ]   [ किंमत २॥ रु.

★ उत्कृष्ट अभिप्राय
★ डेक्कन व्ह. ट्रा. सोसायटीचें बक्षीस

# अर्थ

बुधवार, ता. ९ फेब्रुवारी, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतामधील साखरेचे कारखाने

भारताच्या प्रमुख उद्योगधंद्यांपैकीं साखरेचे कारखाने हा एक आहे. ह्या धंद्याच्या वाढीला अद्याप चांगला वाव आहे. कारण, देशांतील साखरेची सर्व गरज भारतामधील कारखाने भागवूं शकत नाहींत. उत्पादन आणि खप ह्यांच्यांत बरीच तफावत रहाते. १९५१–५२ सालीं साखरेचें उत्पादन १५ लाख टन झालें. १९५२–५३ सालीं तें १३ लाख टन झालें पण १९५३–५४ सालीं तर १० लाख टनच झालें. १९५१–५२ सालीं साखरेचा खप अंदाजें ११॥ लाख टन झाला. १९५३–५४ सालीं खप १८ लाख टन होईल असा अंदाज करण्यांत आला होता. देशांतील सर्व गरज पुरी करण्यासाठीं सरकारला साखरेची आयात करणें अर्थात्‌च भाग पडतें. नोव्हेंबर, १९५३ पासून ऑगस्ट, १९५४ पर्यंत ५,३६,००० टन साखर आयात करण्यांत आली. परदेशाहून साखर आयात करण्यासाठीं दरवर्षी सुमारें ५० कोटी रुपये खर्च करावे लागतात.

परदेशीं जाणारा हा पैसा वांचविण्यासाठीं भारत सरकारनें साखरेचे अधिक कारखाने काढण्यास उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. १९५४ अखेर सरकारनें २३ नव्या कंपन्यांना साखर तयार करण्याचे परवाने दिले आहेत. सध्यां अस्तित्वांत असलेल्या कारखान्यांचा हंगाम १२० दिवसांचा धरला तर ते १५॥ लाख टन साखर निर्माण करूं शकतील. परंतु, अनेक कारणांमुळें इतकी साखर प्रत्यक्षांत निर्माण होत नाहीं. साधारणपणें १३ लाख टन साखर निर्माण करण्यांत येईल असें धरून चालण्यास हरकत नाहीं. १९५५–५६ अखेर आणखी ५ लाख टन साखरेच्या उत्पादनाची सोय केली पाहिजे. भारतामधील साखरेचें बहुतेक उत्पादन उत्तर–प्रदेश आणि बिहार ह्या राज्यांत होतें. पण तेथील नैसर्गिक परिस्थिति साखरेच्या कारखान्यांना फारशी अनुकूल नाहीं. म्हणून महाराष्ट्र मद्रास व म्हैसूर ह्या भागांत साखरेचा धंदा वाढीस लावणें अगत्याचें झालें आहे. ह्या भागांत दर एकरागणिक ६० ते ७० टन ऊंस पिकविणें शक्य आहे. जाव्हांतील उसाचें दर एकरीं उत्पादन जवळ जवळ इतकेंच आहे. उसाचें दर एकरीं उत्पादन आणि उसांतील साखरेचें प्रमाण ह्या दोन गोष्टींवर साखरेच्या कारखान्यांचें भवितव्य अवलंबून असतें. उत्तर–प्रदेश आणि बिहार राज्यांतील उसाचें दर एकरीं उत्पादन गेल्या २० वर्षांत १२ ते १३ टन आहे. तेथील ऊंस गाळण्याचा हंगामहि ९० ते १०० दिवसांचा असतो. दख्खन भागांत दर एकरीं उत्पादन ५० ते ६० टनांपर्यंत वाढवितां येणें शक्य आहे, आणि हंगामहि २०० दिवसांपर्यंत चालू शकेल.

पुढील कोष्टकांत कांहीं देशांतील आंकडे दिले आहेत.

| देश | दर एकरीं साखरेचें उत्पादन (आकडे टनाचे) | साखरेचा उतारा % |
|---|---|---|
| क्यूबा | २·०९ | १२·२५ |
| हवाई | ६·४८ | १०·४६ |
| पेरू | ५·०७ | १२·३३ |
| जाव्हा | ६·४४ | ११४९ |
| फिलिपाइन्स | २·२८ | ८·४५ |
| भारत | १·३९ | ९·७५ |

## मध्य प्रदेशांत पोलादाचा कारखाना

भारत आणि सो. रशिया ह्यांच्या दरम्यान भारतांत एक पोलादाचा कारखाना उभारण्याचा करार झाला आहे. मध्य-प्रदेशांत बिलासपूर जवळ असलेल्या भिलई ह्या ठिकाणीं हा कारखाना काढण्याची शिफारस भारतीय व सोव्हिएट तज्ज्ञांनीं एकमतानें केली आहे. हीच जागा उभयतां देशांच्या तंत्रज्ञांना इतर जागांपेक्षा अधिक सोयीची वाटली. भिलई हेंच ठिकाण निवडण्यास तेथील हवा, जमीन, हिराकूद धरणाचें सानिध्य, विशाखापट्टम् सारख्या बंदराची अनकूलता आणि मजुरीची स्वस्ताई इत्यादि कारणें नमूद करण्यांत आलीं आहेत. भिलई येथें कारखाना काढल्यास वाहतुकीसाठीं रायपूरच्या रेल्वे जंक्शन-चाहि चांगला उपयोग करतां येईल. भिलईपासून ९ मैलांवर लोखंडाची माती विपुल प्रमाणांत सांपडते. पण ह्या खाणींचा अद्यापपर्यंत उपयोगच करण्यांत आलेला नाहीं. १९५८ अखेर कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. कारखान्यासाठीं सुमारें १०० कोटी रुपयांचें भांडवल लागेल. त्यापैकीं निम्में म्हणजे अंदाजें ५० कोटी रुपयांचें भांडवल रशिआ पुरविणार आहे. कारखान्यांत दरवर्षी १० लाख टन पोलादाची निर्मिति करण्यांत येईल. उत्पादनाची रशिआची पद्धत कशी आहे त्याचा अभ्यास करण्यासाठीं भारतीय तज्ज्ञांचें एक मंडळ रशिआंतील पोलादाचे कारखाने पहाण्यास जाणार आहे. कारखान्यासंबंधीं तपशीलवार अहवाल करण्यासाठीं अजून ८ ते ९ महिन्यांचा कालावधि लागेल. सरकेला येथें उभारण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्यासंबंधीचा जर्मन कंपनीचा अहवाल नकतांच सरकारच्या हातीं आला आहे.

## धूम्रपानाविरुद्ध विद्यार्थ्यांची मोहीम

जबलपूर येथील विद्यार्थ्यांनीं धूम्रपानाविरुद्ध मोहीम सुरू केली असून, प्राध्यापकांच्या धूम्रपानावर त्यांचा प्रथम रोख आहे. प्राध्यापकांनीं निदान विद्यार्थ्यांच्या समोर धूम्रपान करूं नये, असा त्यांचा आग्रह आहे.

## श्रीमंत अमेरिकन प्रवाशांची भेट

सुमारें ४०० परदेशी प्रवासी गेल्या आठवड्यांत मुंबई येथें एका बादशाही आगबोटींतून दाखल झाले. हे प्रवासी जगाला वेढा घालून न्यूयॉर्कला ८ एप्रिल रोजीं परततील. भारतांत, प्रत्येकाला ५०,००० रुपयांचा माल विकत घेऊन तो बाहेर जकात न भरतां नेण्यास भारत सरकारनें परवानगी दिली आहे. दोन खास विमानें व सहा खास आगगाड्या त्यांच्यासाठीं मुंबई येथें सज्ज ठेवण्यांत आल्या होत्या.

## भारतांतील आयुर्विमा व्यवसाय

### सुमारें ७½ कोटी रुपयांची वाढ

भारतीय विमा कंपन्यांनीं १९५३ मध्यें भारतांत एकूण १३७·४६ कोटी रु. विमा रकमेचीं व हप्त्यांचें उत्पन्न ७·३४ कोटी रु. येणारीं सुमारें ५,३५,०६० नवीं विमापत्रें दिलीं. भारतांत व्यवसाय करणाऱ्या परदेशी विमाकंपन्यांचे बाबतींत हेच आंकडे अनुक्रमें १७·०३ कोटी रु. विमा-रक्कम, १·०२कोटी रु. हप्त्यांचें उत्पन्न व सुमारें २३,००० विमापत्रें असें होतें.

### नोंदलेल्या कंपन्या व त्यांचें काम

१९३८ च्या विमा कायद्याखालीं नोंदविलेल्या विमा कंपन्यांची संख्या १५ नोव्हेंबर, १९५४ रोजीं ३१९ होती. त्यांपैकीं २१५ भारतीय व इतर परदेशीय होत्या. भारतीय विमा कंपन्यांपैकी १११ केवळ आयुर्विम्याचें, ६१ केवळ इतर प्रकारच्या विम्याचें ४१ दोन्ही प्रकारांचें काम करीत होत्या. परदेशीय कंपन्यांबाबत हेच आंकडे अनुक्रमें ३८८ व १३ होते.

१९५२ शीं तुलना करतां भारतीय विमाकंपन्यांनीं भारतांत केलेल्या आयुर्विमा व्यवसायांत सुमारें १९,००० विमापत्रें ऐवढी वाढ झाली. यामुळें विमा रकमेंत ७.१९ कोटी रु. व वार्षिक हप्त्याच्या उत्पन्नांतहि ०·३३ कोटी रु. वाढ दिसून आली. परदेशी विमाकंपन्यांच्या आयुर्विमा कामांतहि थोडीशी वाढ होती.

भारतीय विमा कंपन्यांनीं भारतांत मिळविलेल्या आणि १९५३ अखेर चालू असलेल्या आयुर्विमा व्यवसायाबद्दलचे आंकडे ३८,३३,००० विमापत्रें, ८२९·९८ कोटी रु. विमा रक्कम व ३९·६९ कोटी रु. हप्त्यांचें उत्पन्न असें होतें. आदल्या वर्षाशीं तुलना करतां हे आंकडे अनुक्रमें १,२२,००० विमापत्रें, ३४·१२ कोटी रु. विमा रक्कम व १·४३ कोटी रु. हप्त्याचें उत्पन्न एवढ्यांनीं जास्त आहेत.

परदेशीय विमा कंपन्यांचे बाबतींत १९५३ चे हेच आंकडे सुमारें २,४६,००० विमापत्रें, १३१·९१ कोटी रु. विमा रक्कम व ७·७२ कोटी रु. हप्त्याचें उत्पन्न असे होतें. आदल्या वर्षापेक्षा १९५३ मध्यें विमापत्रांची संख्या सुमारें १,००० नीं कमी असली तरी विमा रक्कम व हप्त्याचें उत्पन्न यांमध्यें ५·८९ कोटी रु. व ०·७९ कोटी रु. नीं वाढ होती.

भारतीय विमा कंपन्यांनीं भारताबाहेरच्या देशांत १९५३ मध्यें मिळविलेल्या व त्या वर्षाअखेर चालू असलेल्या आयुर्विम्याच्या कामाचे आंकडे अनुक्रमें सुमारें ३०,००० विमापत्रें १४·६६ कोटी रु विमा रक्कम व २,७२,००० विमापत्रें आणि ७७·०३ कोटी रु. विमा रक्कम असे होते.

### उत्पन्न व आयुर्विमानिधींत वाढ

एकूण आयुर्विम्याच्या कामाचें १९५३ मधील उत्पन्न भारतीय विमा कंपन्यांचे बाबतींत ५४·२७ कोटी रु. व परदेशीय कंपन्यांचे भारतांतील कामाचे बाबतींत ९·६० कोटी रु. होतें. हक्कपूर्ति व सोड-किंमत देणें यासारख्या कारणांमुळें या कंपन्यांना अनुक्रमें २९·४८ कोटी रु. व ६·९८ कोटी रु. यावे लागले ही गोष्ट विचारांत घेतां, बाकी उरलेली अनुक्रमें २४·७९ कोटी रु. व २.६२ कोटी रु. ही रक्कम या कंपन्यांच्या आयुर्विमा निधींतील वाढ दर्शविते.

### रद्द विमापत्रांचें प्रमाण

विमापत्रें रद्द होण्याबाबतचा सर्व भारतीय विमा कंपन्यांचा एकत्रित अनुभव देणारा एक तक्ता या अहवालांत दिलेला आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, पहिल्या कांहीं वर्षांतच विमापत्रें रद्द होण्यामुळें मिळविलेल्या नव्या कामापैकीं बरंचसें काम फुकट जातें. १९५३ मध्यें विमापत्रें रद्द होण्याचें प्रमाण त्या वर्षांत चालू असलेल्या सरासरी एकूण आयुर्विम्याच्या ८·९ टक्के पडतें.

### व्याज व खर्चाचें प्रमाण

सरासरी आयुर्विमानिधीवर भारतीय आयुर्विमा कंपन्यांना मिळालेल्या व्याजाच्या प्रमाणांत कांहींशी वाढ दिसून आली व तें ३·५० टक्के पडलें. एकूण हप्त्यांच्या उत्पन्नाशीं व्यवस्था-खर्चाचें प्रमाण भारतीय व परदेशी कंपन्यांचे बाबतींत अनुक्रमें २७·३ व २०·७ टक्के पडलें. गतवर्षाचे हेच आंकडे अनुक्रमें २७·२ व २२·४ टक्के होते.

### मूल्यमापनें

या वार्षिकांत प्रसिद्ध करण्यांत आलेल्या भारतीय विमा कंपन्यांच्या ५२ मूल्यमापनांपैकीं ३९ मूल्यमापनांत शिल्लक दिसून आली; यांपैकी २० कंपन्यांनीं ती शिल्लक विमेदार आणि किंवा भागीदार यांमध्यें विभागून दिली, तर इतर कंपन्यांनीं ती पुढील हिशेबीं ओढून घेतली. १३ कंपन्यांच्या मूल्यमापनांत तोटा दिसून आला. त्यांपैकीं १० कंपन्यांनीं तो भरणा झालेल्या भांडवलांतून भरून काढला, तर बाकीच्यांचे बाबतींत तसें होऊं शकलें नाहीं.

### आयुर्विमेतर विमा व्यवसाय

भारतीय विमा कंपन्यांनीं केलेल्या आयुर्विमेतर विमा व्यवसायांतील हप्त्यांचें उत्पन्न १५·०२ कोटी रु. झालें. यांपैकीं ७·८७ कोटी रु. आग विम्याचे, २·७३ कोटी सागरी विम्याचे व ४·४६ कोटी रु. इतर प्रकारच्या विम्याचे होते. परदेशी कंपन्यांचे बाबतींत हेच आंकडे २·७२ कोटी रु. आग विम्याचे, १·६६ कोटी सागरी विम्याचे व १·९१ कोटी रु. इतर प्रकारच्या विम्यांचे, असे होते.

भारताबाहेरच्या प्रदेशांत या प्रकारच्या विम्यांचें काम करणाऱ्या भारतीय विमा कंपन्यांना अशा व्यवसायांतून हप्त्यांचें निव्वळ उत्पन्न ८२९ लक्ष रु. आलें. यांपैकीं ६९·१ टक्के उत्पन्न आग विम्याचें होतें.

### विमा एजंट

विमा एजंटाचें काम करण्यासाठी एकूण ९४,१४० परवाने देण्यांत आले, त्यांपैकीं २०,४७१ परवाने स्त्रियांना देण्यांत आले होते. याशिवाय प्रिन्सिपल एजंट म्हणून काम करण्यासाठी ८५९, चीफ एजंट म्हणून काम करण्यासाठी ४४३, व स्पेशल एजंट म्हणून ५,६३४ परवाने देण्यांत आले. सर्व विमा कंपन्यांच्या सर्व प्रकारच्या विम्यांचें मिळून १९५३ मध्यें मिळालेल्या हप्त्यांच्या उत्पन्नांत, प्रत्येक विमाएजंटानें मिळविलेल्या कामाच्या हप्त्यांचें सरासरी उत्पन्न २,६१० रु. पडतें.

---

**सुरतमध्यें कामगारांसाठी घरें**—औद्योगिक शहरांतून कामगारांसाठी घरें बांधण्याच्या सरकारी योजनेप्रमाणें मुंबई सरकारनें सुरत शहरांत १०० घरें बांधण्याचें ठरविलें आहे. या कामासाठी २,७५,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. सुरत शहरांत नव्या योजनेप्रमाणें बांधण्यांत येणारीं हीं पहिलींच घरें आहेत.

**अणुकिरणरजापासून बचाव**—बद्री आश्रमाचे रहिवासी स्वामी नारायणानंद सरस्वती ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, हिमालयांतील कांहीं वनस्पतींचा रस अंगाला चोपडला तर अणुस्फोटानंतर होणाऱ्या घातक किरणरजापासून माणसाचा संपूर्णपणें बचाव करतां येईल.

# बेकारीस आळा घालण्यासाठी ग्रामोद्योगांस प्रोत्साहन

## मुंबई राज्यांतील औद्योगिक सहकार

उत्पादकांची सहकारी संघटना हा बराच नवीन उपक्रम आहे. ग्रामोद्योग आणि लहान उद्योगधंदे ह्यांच्या वाढीस उत्तेजन देण्याचें मध्यवर्ती व राज्यसरकारांचें धोरण आहे; आणि त्यांची संघटना सहकारी पद्धतीवर व्हावी, हें तत्त्व मान्य करण्यांत आलेलें आहे. बाजारपेठेंतील स्पर्धेचें स्वरूप ह्या सहकारी संघटनेवर अतिशय तीव्र परिणाम करूं शकतें, ह्या दृष्टीनें अशा उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी सरकारनें चालविलेल्या प्रयत्नांकडे पाहिले पाहिजे. सरकारची सर्व बाजूंनीं मदत असली, तरी अखेर औद्योगिक सहकारी चळवळ ही लोकांचीच चळवळ आहे, हें विसरून चालणार नाहीं. म्हणून, ग्रामीण उद्योगांत गुंतलेल्यांच्या संघटनेस सरकारनें मदत करावी, त्याचप्रमाणें जनतेनें ग्रामोद्योगाचा माल विकत घेऊन आपल्याचपैकी कष्ट करणाऱ्या गरीब पण अन्नदार बांधवांना जगण्यास साहाय्य करावें हें उचित आहे. ग्रामोद्योगांपैकीं कापडधंद्याची हलाखी विशेषच चिंतनीय आहे. गिरण्यांची भरभराट झाली, तरी खेडोंपाडीं बेकारी वाढत चालली आहे. "खेड्यापाड्यांतील अर्धपोटी जनता रोजगारीची मागणी करते—बेकार भत्त्याची मागणी करीत नाहीं. त्यांच्या सेवेचेंच हें आवाहन आहे." अ. भा. खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष, श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं ह्या शब्दांत ग्रामोद्योगांचें आपल्या आर्थिक जीवनांतील स्थान वर्णिलें आहे.

### कामधंदा, हेंच खरें उद्दिष्ट

अखिल भारतीय खादी आणि ग्रामोद्योग मंडळानें पुणें येथें गेल्या नोव्हेंबरमध्यें भरविलेल्या परिषदेचें उद्घाटन राष्ट्रपतींनीं केलें. त्यावेळीं त्यांनीं आपल्या राष्ट्रीय आर्थिक घडींत ग्रामोद्योगांना किती महत्त्वाचें स्थान आहे, हें स्पष्ट करून सांगितलें आणि बेकारी निवारणाचे कामीं ग्रामोद्योगांना मोठी कामगिरी कशी बजावतां येईल ह्याचें त्यांनीं वर्णन केलें. ते म्हणाले :—

आपल्या देशांत हस्तव्यवसाय आणि फावल्या वेळांत घरच्या घरींच सहज करतां येतील असे छोट्या प्रमाणावरील धंदे यांना विशेष महत्त्व आहे. त्याकडे डोळेझांक करून केवळ औद्योगीकरणाद्वारेंच आपण बेकारीचा प्रश्न सोडवूं शकूं ही कल्पना चुकीची आहे. बेकारीचा प्रश्न यशस्वीपणें सोडविल्यावांचून आपण दारिद्र्य दूर करूं शकणार नाहीं. कामधंदा नसणारे किंवा अंशतः कामधंदा असलेले सर्व हेच मुख्यत्वें दारिद्र्याचे बळी असल्यामुळें ग्रामीण विभागांतील जनतेच्या हिताच्या दृष्टीनें व एकंदरींत आपल्या देशाच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें आपले घरगुती धंदे लोकप्रिय करण्यासाठी व त्यांच्यांत सुधारणा होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. उत्पादनवाढ हेंच आपलें एकमेव ध्येय मानतां कामा नये, लोकांना सुसंपन्न करणें व जास्तींत जास्त लोकांस कामधंदा मिळवून देणें हेंच आपलें खरें उद्दिष्ट असलें पाहिजे. आपल्या देशांतील लक्षावधी लोकांची उपजीविका हस्तव्यवसाय व छोट्या उद्योगधंद्यांवर चालते हें सर्वश्रुत आहे. म्हणून या धंद्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचा विकास साधणें हेंच आपलें परमोच्च कर्तव्य होय.

बेकारीनें उग्र स्वरूप धारण केलेल्या आजच्या काळांत, रोजगाराची हमी देणाऱ्या मार्गापेक्षा देशास अधिक लाभदायक दुसरें कांहींच नाहीं.

अशा उद्योगधंद्यांची संघटना सहकारी तत्त्वावर होऊन ती प्रभावी व्हावी, ह्यासाठी प्रयत्न चालू आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ग्रामोद्योगांच्या वाढीस महत्त्वाचें स्थान देण्यांत येणार आहे, आणि त्या दृष्टीनें सहकारी संघटनेच्या यशाकडे लक्ष वेधून रहाणें स्वाभाविक आहे. मुंबई राज्यांतील औद्योगिक सहकाराचा आढावा ह्याच उद्देशानें येथें घेतलेला आहे.

### औद्योगिक सहकाराची परिस्थिति

१९५२–५३ चा, मुंबई राज्यांतील औद्योगिक सहकारी सोसायट्या व ग्रामोद्योग ह्यांवरील जॉइंट रजिस्ट्रारचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून असें दिसून येतें, कीं ह्या सोसायट्यांच्या खेळत्या भांडवलांत बरीच घट झाली आहे. हें भांडवल १९५१–५२ मध्यें ३ कोटी, ४२ लक्ष रु. होतें तें अहवालाचे वर्षी २ कोटी, ३९ लक्ष रुपयांवर आलें. ज्या सोसायट्या नफ्यांत होत्या, त्यांच्या नफ्याचा आकडा कमी झाला असून ज्या सोसायट्या तोट्यांत होत्या त्यांचा तोटा वाढला आहे. धंद्याचें मान कमी असल्यामुळें सोसायट्यांना पूर्वीइतक्या खेळत्या भांडवलाची आवश्यकता उरली नाहीं. एकूण तोट्यापैकीं ३०% तोटा विणकरांच्या सोसायट्यांचा आहे, २२% तोटा जिल्हा औद्योगिक सहकारी संघांचा आहे आणि ३०% तोटा जंगल-कामगार सोसायट्यांचा आहे. सुताच्या नियंत्रित वाटपपद्धतीचा अंत, सुताच्या किंमतींमधील घट, मालाचा उठाव करण्याची अडचण, हीं पहिल्या दोन प्रकारच्या सोसायट्यांस आलेल्या तोट्याचीं प्रमुख कारणें आहेत. जंगल कामगार सोसायट्यांना कुपांची वाढलेली किंमत व विक्रीची अडचण, पुरेशा व वक्तशीर भांडवलपुरवठ्याचा अभाव, नुकसानकारक किंमतींत विक्री, कांहीं ठिकाणीं गैरशिस्त व्यवस्था, इत्यादि कारणांमुळें तोटा सोसावा लागला. सुव्यवस्थित, मोठ्या उद्योगांनाहि जेथें मंदीचा जबर तडाखा बसला, तेथें लहान प्रमाणावर उद्योग करणाऱ्या सहकारी सोसायट्या त्यांतून कशा निसटणार ? "सभासदांचा व सर्वसाधारण जनतेचा विश्वास संपादन करणें हें औद्योगिक सहकारी सोसायट्यांच्या प्रगतीचें लक्षण मानलें, तर परिस्थिति असमाधानकारक आहे, असें म्हटलें जाणार नाहीं." असें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. गेलीं दोन वर्षें, विद्यमान सोसायट्यांची संघटना अधिक बळकट करण्याकडेच लक्ष पुरविण्यांत येत आहे. तेव्हां, सोसायट्यांची फक्त संख्या ४% नें वाढली, हें ठीकच आहे. तथापि, त्यांच्या वसूल भांडवलांत २.१% व रिझर्व्ह आणि इतर फंडांत १८.५% वाढ नोंदलेली आहे. धंद्याची परिस्थिति सुधारली आणि लोकांची क्रयशक्ति अपेक्षेप्रमाणें वाढली म्हणजे सोसायट्यांची स्थिति स्थिरावेल आणि त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारेल अशी अपेक्षा अहवालांत व्यक्त करण्यांत आली आहे.

### विणकरांच्या सोसायट्यांस विशेष झळ

मंदीची झळ विणकरांच्या सोसायट्यांना सर्वांत अधिक लागली. विणकरांचा धंदा गेलीं २–३ वर्षें अत्यंत कठीण अवस्थेंत आहे, व त्याच्या उद्धारासाठी मध्यवर्ती व राज्य सरकारें उपाययोजना करीत आहेत. त्यांची माहिती व त्यांची फलश्रुति १९५३-५४ च्या अहवालांत उपलब्ध होईल. अहवालाचे वर्षी विणकरांच्या सोसायट्यांची संख्या ४८२ ची ४८७ झाली, पण सभासदसंख्या ६५,१०१ वरून ६३,०९५ वर उतरली; भागभांडवल २८,४९,०५४ रु चें २८,१४,९३९ रु. झालें व खेळतें भांडवल १,०८,५०,९४१ रुपयांवरून ८४,३०,११४ रुपयांवर आलें. कांहीं सोसायट्यांनीं मिळून ६९,७३६ रु. नफा मिळविला—तर इतरांच्या तोट्याची बेरीज ६,१५,५८५ रु. झाली.

## औद्योगिक सहकारी सोसायट्यांची तुलनात्मक परिस्थिति
( विणकर सोसायट्या धरून )

| | १९५१–५२ | १९५२–५३ |
|---|---|---|
| सर्व सोसायट्यांची संख्या | १,२८१ | १,३३० |
| सभासदसंख्या | १,४१,१७७ | १,३९,६५९ |
| | रु. | रु. |
| वसूल भाग भांडवल | ६४,४१,७८० | ६५,७७,३६१ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ५४,६०,४१३ | ६४,७७,३६१ |
| खेळतें भांडवल | ३,४१,८४,८३६ | २,३८,८४,५७९ |
| नफा | १५,९०,५५१ | ८,५५,३६७ |
| तोटा | ११,४०,३८९ | २०,३३,१५४ |

## प्राथमिक औद्योगिक सहकारी सोसायट्यांची तुलनात्मक परिस्थिति
( विणकर सोसायट्या वगळून )

| | १९५१–५२ | १९५२–५३ |
|---|---|---|
| नोंदलेल्या सोसायट्या | ७३ | ६८ |
| एकूण संख्या | ७७६ | ८२० |
| सभासद संख्या | ५७,३४६ | ६३,८४७ |
| | रु. | रु. |
| वसूल भागभांडवल | २४,८३,२१४ | २५,९४,४५२ |
| रिझर्व्ह व इतर फंड | १४,३४,०५३ | १७,९९,६१० |
| खेळतें भांडवल | १,०४,११,३८२ | ९८,०४,९३५ |
| खरेदी व विक्री | १,४६,००,०८१ | १,२१,९०,५३३ |
| नफा | ७,०६,४५७ | ७,२३,५२४ |
| तोटा | ६,४१,९३१ | ८,५८,६०१ |

## सर्व प्रकारच्या औद्योगिक सहकारी संस्था
( विणकर सोसायट्या वगळून )

खालील तक्त्यांत विणकरांच्या वगळून बाकीच्या सर्व सोसायट्यांची संख्या १९५१–५२ अखेर किती होती व ती १९५२–५३ अखेर किती झाली, ह्याचे तुलनात्मक आकडे दिले आहेत.

| उद्योग | ३०–६–५२ रोजीं | ३०–६–५३ रोजीं |
|---|---|---|
| १ मधमाशा पाळणें | ११ | ११ |
| २ तेलघाणी | ४७ | ४३ |
| ३ धान्य झातसडणें | २ | ५ |
| ४ वेत-बांबू काम | ३२ | ३६ |
| ५ कातड्याचें काम | १८९ | १९१ |
| ६ सुतारकाम, लोहारकाम | ७० | ७२ |
| ७ धातू काम | २० | २० |
| ८ चंदनावर नक्षीकाम | ३ | ३ |
| ९ मांडी | १६ | १६ |
| १० जंगलकामगार सोसायट्या | १०८ | ११६ |
| ११ मजूर कंत्राटें | ३७ | ४८ |
| १२ स्त्रियांच्या सोसायट्या | ३७ | ३८ |
| १३ दोरकाम | ३१ | ३९ |
| १४ नीरा व ताडगूळ | २ | ९ |
| १५ मीठ | ५ | ६ |
| १६ इतर उद्योग | १६६ | १६७ |
| एकूण | ७७६ | ८२० |

**कॉलेजसाठी राजवाड्याचा उपयोग**—बद्रिनाथ (ओरिसा) येथील एम. पी. सी. कॉलेजला स्वतःची इमारत नसल्यानें सध्यां कॉलेजचे वर्ग एका शाळेच्या इमारतींत भरविण्यांत येत आहेत. ओरिसा सरकारनें मयूरभंजच्या संस्थानिकाचा राजवाडा विकत घेऊन तो कॉलेजला देण्याचें ठरविलें आहे, असें कळतें.

**विद्यार्थ्यांच्या पालकांना नोटिसा**—अहमदाबाद म्युनिसिपल स्कूलबोर्डानें ३,९७७ विद्यार्थ्यांच्या पालकांना नोटिसा देण्याचें ठरविलें आहे. ह्या पालकांनीं आपलीं ७ ते ११ वर्षांपर्यंत वय असलेलीं मुलें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी शाळेंत धाडलीं नाहींत. ६५५ मुलगे आणि ३,१५५ मुली बोर्डाच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कक्षेंत येतात.

**भोपाळमधील जंगलांचा विकास**—भोपाळमधील जंगलें व त्यापासून मिळणाऱ्या वस्तू ह्यांचा अधिक उपयोग करून घेण्यासाठी भोपाळच्या सरकारनें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ६२ लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. राज्याच्या क्षेत्रापैकी सुमारें ८ लक्ष[1] एकर जमीन जंगलानें व्यापलेली आहे. जंगल–निर्मित मालामुळें राज्य–सरकारला चालू सालीं २२ लाख रुपयांचें उत्पन्न झालें.

**आसाममधील सहकारी चळवळ**— आसाम सरकार राज्यांतील सहकारी चळवळीची वाढ करण्यासाठी १४ फेब्रुवारीपासून प्रचाराचा पंधरवडा पाळणार आहे. ह्या मुदतींत सभासदांकडून ठेवी गोळा करणें आणि नवे सभासद करणें, ह्या गोष्टींसाठी सहकारी चळवळींतील लोक खटपट करतील. राज्यांत सहकारी सोसायट्यांजवळील ठेवी पंधरा दिवसांच्या अखेर २ लाख रुपयांनीं वाढतील असा अंदाज आहे.


## The Bank of Maharashtra, Limited
## NOTICE

Notice is hereby given that the twentieth Ordinary General Meeting of the Share-holders of the Bank of Maharashtra, Ltd., will be held at the registered office of the Bank at 898, Sadashiv Peth, Poona City on Sunday, the 27th February, 1955 at 4 P. M. ( S. T. ) to transact the following business :—

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account and the Reports of the Directors and of the Auditors for the year ended 31st December, 1954.

*(2) To declare a Dividend.

(3) To elect three Directors in the places of the retiring Directors who are eligible for re-election.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration.

(5) To transact such other business as may be allowed by the Chairman.

Poona City,
30th January, 1955.

By order of the Board,
C.V. Joag,
Manager.

*N. B.* :—The Share-Transfer Book of the Bank will be closed from 22nd Day of February, 1955 to the 3rd day of March, 1955, both days inclusive.

*The Dividend, when declared, will be payable on and after Saturday, the 26th March 1955 and Dividend Warrants will be posted to the registered addresses of the share-holders. *Change of address, if any, should immediately be communicated to the Bank.*

### उद्योगधंद्यांवरील कर कमी करण्याची मागणी

फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज ह्या संघटनेनें एक पुस्तिका काढून ब्रिटनच्या अर्थमंत्र्यांकडे येत्या अंदाजपत्रकाच्या वेळीं अमलांत आणण्यासाठी कांहीं सूचना केल्या आहेत. ब्रिटनमधील उद्योगधंद्यांच्या वाढीच्या व आर्थिक विकासाच्या दृष्टीनें फेडरेशननें ह्या सूचना केल्या आहेत. येत्या फडणिशी वर्षाचें द्रव्यविषयक ध्येय काय असावें ह्याची चर्चा करतांना पुस्तिकेंत असें म्हटलें आहे कीं, नवीन आर्थिक वर्षाचें धोरण ब्रिटनच्या उद्योगधंद्यांचें उत्पादन वाढण्यास पोषक आणि उत्पादनाची किंमत खाली ठेवण्यास उपयुक्त असें द्विविध असलें पाहिजे. अशा प्रकारचें धोरण ठेवलें गेलें तरच ब्रिटिश मालाला परदेशाकडून होणाऱ्या स्पर्धेला तोंड देतां येईल. त्याचबरोबर प्राप्तीवरील कर, खरेदीवरील कर आणि नफ्यावरील कर ह्यांच्या आकारणींत कपात करण्यांत आला पाहिजे. खाजगी भांडवलाच्या लिमिटेड कंपन्यांवरील कर कमी करण्यांत आला पाहिजे. रस्त्यावरील वहातुकीच्या मोटारगाड्यांसाठी जें जळण वापरण्यांत येतें त्यावर घेण्यांत येणाऱ्या करांतहि कपात होणें जरूर आहे. उद्योगधंद्यांसाठीं बांधण्यांत येणाऱ्या इमारतींवर जी सूट देण्यांत येतें तींत २० टक्केपर्यंत वाढ करण्यांत यावी. ह्या सूचना अंमलांत आणल्या तर राष्ट्रीय उत्पन्न कमी होईल हें खरें; पण ह्या धोरणामुळें वेतनावर काम करणाऱ्या सर्वच लोकांत पुढाकार घेऊन काम करण्याची रुचि वाढीस लागेल. मूलभूत उद्योगधंद्यांत–विशेषतः जे उद्योगधंदे आपला माल परदेशीय बाजारपेठांतून पाठवितात त्या धंद्यांत–भांडवल गुंतविण्यास फेडरेशनें सुचविलेल्या धोरणामुळें उत्तेजन मिळेल असा दावा पुस्तिकेंत करण्यांत आला आहे.

---

### पुणें जिल्हा सहकारी कार्यकर्त्यांची परिषद

पुणें जिल्हा सहकारी बोर्डाच्या विद्यमानें ता. २७।१।५५ रोजीं पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघाचे सभागृहांत मे. डेप्युटी रजिस्ट्रार, को–ऑपरेटिव्ह सोसायटीज, मध्यभाग, पुणें यांचे अध्यक्षतेखालीं परिषद झाली.

या परिषदेचें उद्‌घाटन मे. रजिस्ट्रारसाहेब को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् मुंबई राज्य पुणें यांनीं करतांना शेतकी कर्जपुरवठा व शेतीमालाच्या खरेदीविक्रीच्या सोईचें महत्त्व प्रतिपादन केलें. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत थोडक्यांत सहकारी चळवळीचा आढावा घेतला. सदर सभेस श्री. जे. टी. सावंत, श्री. बी. ज. करंदीकर, श्री. डी. व्ही. पोतदार, रावसाहेब खोले व इतर सहकारी कार्यकर्ते, सरकारी अधिकारी मिळून सुमारें ३०० लोक हजर होते. सभेंत शेतकरी व्यवहाराचें धोरण, शेत मालाची खरेदीविक्री, मावळ भागांत सरकारी धान्य डेपोचें ग्रेन सोसायट्यांत रूपांतर, पाणीपुरवठा व शेती सोसायट्यांच्या अडचणी, द्वितीय पंचवार्षिक योजना व सहकारी चळवळीचें धोरण, यावर ठराव पास करण्यांत आले.

---

**दुप्पट अंडीं देणारी कोंबडी**—मद्रास शहरांत राज्य सरकारनें कोंबड्यांचे फार्म चालविले आहेत. फार्मवरील तज्ज्ञांनीं निरनिराळ्या प्रकारच्या कोंबड्यांच्या जोड्यांपासून एक नवी जात निर्माण केली आहे. सामान्य कोंबडी दरवर्षी सुमारें ५० अंडीं देते. नवीन जातीची कोंबडी जवळ जवळ १२० अंडीं देईल, असें सांगण्यांत येत आहे.

## मद्रास राज्यांतील सहकारी चळवळीची चौकशी

### कमिटीची नेमणूक

मद्रास राज्यांतील सहकारी चळवळीचा आढावा घेऊन आणि तिच्या आजच्या गरजा अजमावून तिच्या विस्तारासाठीं शिफारशी करण्याकरितां त्या राज्याच्या सरकारनें एक कमिटी नेमली आहे. दुसरें महायुद्ध व त्यामुळें आलेली सरकारी नियंत्रणें, स्वातंत्र्यप्राप्ति आणि मद्रास राज्याची फाळणी, ह्या तीन महत्त्वाच्या घटना लक्षांत घेऊन कमिटीनें शिफारशी करावयाच्या आहेत. नियोजन मंडळ, नॅशनल एक्सटेन्शन सर्व्हिस, कम्युनिटी प्रॉजेक्टस्, हँडलूम बोर्ड, रिझर्व्ह बँक, इत्यादि संघटना सहकारी चळवळीचा उपयोग करून घेण्यास उत्सुक आहेत; तेव्हां सहकारी चळवळीला ह्या संधीचा कितपत फायदा करून घेतां येईल हें पहाणें व त्याबाबत व्यावहारिक कार्यक्रम आखणें अगत्याचें झालें आहे.

---

## बँक–नोकरांना कामावर घेण्याचा हुकूम

### सुप्रीम कोर्टानें तहकुबी दिली

एप्रिल, १९५१ मध्यें पंजाब नॅशनल बँकेच्या बहुतेक शाखांतील नोकरांनीं संप केला. त्यांतील कित्येक नोकरांना बँकेनें काढून टाकलें. ट्रायब्यूनलकडे प्रकरण गेलें, तेव्हां त्यानें नोकरांची बहुतकीं उचलून धरली. नोकरांनीं लेबर अपेलेट ट्रायब्यूनकडे अपील केलें, तेव्हां त्यानें १५० पैकीं १३६ नोकरांना पुनः कामावर घेण्यांत यावें असा हुकूम केला व सर्व १५० नोकरांचा खर्च देवविला. बँकेनें ह्या हुकुमावर अपील करण्याची सुप्रीम कोर्टाकडे मंजुरी मागितली आहे. तूर्त, लेबर अपेलेट ट्रायब्यूनलच्या हुकुमाची अंमलबजावणी स्थगित ठेवावी, असा हुकूम सुप्रीम कोर्टानें दिला आहे.

---

## बेकायदा सावकारी विरुद्ध उपाययोजना

### कायद्यांत दुरुस्ती

१९४६ च्या मुंबई सावकारी नियंत्रण कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येणार असून त्यान्वयें रजिस्ट्रार, असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ मनि–लेंडर्स आणि याबाबत त्यांनीं अधिकार दिलेले इतर अधिकारी यांना एकादा इसम बेकायदेशीर रीत्या सावकारी करीत असल्याचा संशय आल्यास त्याच्या हिशेबाच्या वह्या तपासणीसाठीं मागविण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. तसेंच, परवान्याशिवाय सावकारी करणें हा वरील दुरुस्ती अन्वयें कॉग्निझेबल गुन्हा ठरविण्यांत आला आहे. तसेंच बेकायदेशीर सावकारीचीं प्रकरणें शोधून काढण्याच्या कामीं पोलिसांची मदतहि रजिस्ट्रार व असिस्टंट रजिस्ट्रार यांना वरील दुरुस्ती अन्वयें घेतां येईल.

---

### सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाची नोटीस

दक्षिण सातारा जिल्हा को–ऑप. बोर्डाच्या विद्यमानें तासगांव येथें सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्ग भरणार आहे. सदर वर्ग १५ फेब्रुवारी, १९५५ पासून दीड ते दोन महिने चालेल. दक्षिण सातारा जिल्ह्यांतील सहकारी संस्थांनीं आपले अन्ट्रेन्ड सेक्रेटरींना सदर वर्गाला पाठवून वर्गाचा फायदा घ्यावा.

दक्षिण सातारा जिल्ह्यांतील नवीन अन्ट्रेन्ड सेक्रेटरींनींहि व इतर व्ह. फा. पास झालेल्या उमेदवारांनीं अर्ज ता. १५–२–५५ चे आंत पाठवावेत. सोबत वर्ग व परीक्षेची फी मिळून एकंदर रु. ३ ची मनिऑर्डर पाठवावी.

"पांच आशादायक वर्षे ! रचना व निर्मिति करण्याचा हा काल. या काळांत माझ्या बालकाच्या आरोग्याची निगा राखली जाईल. त्याला मोफत शिक्षण मिळेल. माझ्या कुटुंबाच्या पोषणाची कसलीहि चिंता उरणार नाही...जर अधिक कष्ट केले तर आपलें म्हणतां येईल असे घर सुद्धां बांधतां येईल. !"

पंचवार्षिक योजना-निधीचा जवळजवळ एक चतुर्थांश आपल्या सामाजिक कार्याचें क्षेत्र सुधारण्यास व विस्तृत करण्यास वापरला जाईल. ४२५ कोट रुपये जनतेच्या राहणीचें मान वाढविण्यास खर्च केले जातील. त्यांतून १३,००० नवीन डॉक्टर्स, २०,००० नवीन नर्सेस व मिड-वाइव्हस् शिकवून तयार करण्यात येतील. इ. स. १९५६ पर्यंत सहावर्षांवरील ६० टक्क्यांहून अधिक मुलें आपल्या प्राथमिक शाळांत असतील. ही दूरगामी योजना आपला भावी कालावरील विश्वास व्यक्त करते. हीच खरोखर......

## भावी पिढीसाठीं प्रतिज्ञा

पंचवार्षिक योजनेंतील विविध कल्पना अमलांत आणण्या-साठीं लाखो टन पोलाद वापरलें जाईल, आणि म्हणून, आपल्या राष्ट्राच्या व जनतेच्या अधिक सुसंपन्न व अधिक फलदायी भविष्याचा पाया घालण्यांत पोलाद अनेक महत्त्वपूर्ण तऱ्हेनें उपयोगास येईल.

दी टाटा आयर्न ॲन्ड स्टील
कंपनी लिमिटेड.




हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.